# अधिकार व कार्ये.

१. **महासंचालक (सदस्य-सचिव)**

क) राज्य शासन, देऊ शकेल अशा कोणत्याही आदेशांच्या अधीन राहून, परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कृषि परिषदेचे सदस्य-सचिव पुढील गोष्टींकरिता जबाबदार असेल -

एक) परिषदेच्या कामाची योग्य अंमलबजावणी.

दोन) परिषदेच्या कर्मचा-यांची कर्तव्ये विहित करणे.

तीन) परिषदेच्या कार्यालयीन कामावर एकूण देखरेख करणे व नियंत्रण ठेवणे.

चार) एकूण विद्यापीठांच्या संशोधन, शिक्षण व विस्तार शिक्षणाच्या सर्व कामांमध्ये व परिषदेच्या इतर कामांमध्ये समन्वयन राखणे व त्यांचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करणे.

पाच) कृषि, पशुसंवर्धन व त्याच्याकडे निर्देशित केलेले संलग्न विषय यांच्याशी संबंधित सर्व बाबींमध्ये परिषदेला व राज्य शासनाला सल्ला देणे.

सहा) उपाध्यक्ष व अध्यक्ष यांनी त्याच्याकडे खास करून सोपविलेली कोणतीही इतर कामे तो पार पाडेल.

ख) सदस्य-सचिव, त्याला योग्य वाटतील असे अधिकार परिषदेच्या कोणत्याही अधिका-याकडे लेखी सोपवू शकेल.

२. **संचालक (शिक्षण)**

राज्यातील कृषि विद्यापीठांच्या शैक्षणिक कार्याच्या समन्वयन आणि व्यवस्थापन याकरिता तो प्रत्यक्षपणे सदस्य-सचिवाला जबाबदार असेल. तो खालील कार्ये व कर्तव्ये पार पाडेल :-

एक) तो राज्यातील कृषि विद्यापीठांच्या शैक्षणिक कार्यक्रमांच्या समन्वयानाकरिता त्याचप्रमाणे योग्य व्यवस्थापनासाठी जबाबदार असेल.

दोन) कृषि विद्यापीठे अधिनियमाच्या तरतुदींचे आणि त्यांनी स्वीकारलेल्या शिक्षणविषयक कार्यक्रमांकरिता लागू असणा-या संविधींचे, नियमाचे त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या व परिषदेच्या निदेशांचे देखील पालन करतात यावर तो बारीक लक्ष ठेवेल.

तीन) तो, राज्यातील कृषि विद्यापीठांच्या विद्यापरिषदेचा निमंत्रित सदस्य असेल.

चार) तो, शिक्षणविषयक कार्यक्रमांशी संबंधित बाबींमध्ये कृषि विद्यापीठे व राज्य शासन / भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांच्यामधील संपर्कासाठी जबाबदार असेल.

पाच) तो, विद्यापीठांमध्ये शिक्षणाशी संबंधित झालेल्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी जबाबदार असेल आणि कृषि शिक्षणाशी संबंधित विद्यापीठांच्या कामकाजासंबंधी नियतकालिक मूल्यमापन करण्याकरिता देखील तो जबाबदार असेल. आणि त्याचा अहवाल सदस्य-सचिवाकडे सादर करेल, ज्याकरिता शिक्षणसंचालक, सहयोगी अधिष्ठाता व इतर शैक्षणिक कर्मचारी यांची बैठक बोलाविण्याचा अधिकार त्याला असेल.

सहा) तो, शिक्षणसंचालक व विद्यापीठांचे कुलसचिव यांच्याशी विचारविनियम करून प्रवेश, परीक्षा या बाबतीत विद्याविषयक विनियम तयार करण्याकरिता जबाबदार असेल आणि ते विनियम तो कृषि परिषदेला सादर करेल.

सात) तो, कृषि विद्यापीठांतील संचालक (शिक्षण) यांच्याशी विचारविनियम करून विविध शिक्षणक्रमांच्या पाठयक्रमामध्ये बदल करण्याकरिता जबाबदार असेल, आणि तो, त्याच्या शिफारशी कृषि परिषदेला सादर करेल.

आठ) तो, कृषि विद्यापीठांमध्ये अध्यापनातील शिस्त राखण्यासाठी मार्गदर्शन करण्याकरिता जबाबदार असेल.

नऊ) तो, राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांच्या अध्यापन क्षेत्रामधील योजना प्रस्तावांच्या छाननीकरिता आणि ते प्रस्ताव मान्यतेसाठी कृषि परिषद राज्य शासन किंवा प्रकरणपरत्वे, भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांच्याकडे सादर करण्यासाठी

जबाबदार असेल

दहा) सदस्य-सचिवाने त्याच्याकडे खास करून सोपविलेली इतर कोणतीही कामे तो पार पाडेल.

**३. संचालक (संशोधन)**

तो, राज्यातील कृषि विद्यापीठांच्या संशोधनात्मक कामाचे समन्वयन व व्यवस्थापन याच्याशी संबंधित प्रश्नांमध्ये प्रत्यक्षपणे सदस्य-सचिवाला जबाबदार असेल, तो खालील कर्तव्ये पार पाडेल :-

एक) तो, राज्यातील कृषि विद्यापीठांच्या संशोधन कार्यक्रमांचे समन्वयन व व्यवस्थापन यासाठी जबाबदार असेल.

दोन) तो, राज्यातील कृषि विद्यापीठांच्या संशोधन परिषदेचा निमंत्रित सदस्य असेल.

तीन) तो, संशोधन कामांशी संबंधित प्रश्नांमध्ये कृषि विद्यापीठे, भारतीय कृषि अनुसंधान परिषद व राज्य शासन यांच्यामधील संपर्क अधिकारी असेल.

चार) तो, संशोधन कार्याशी संबंधित योजना प्रस्तावांच्या छाननीकरिता व ते प्रस्ताव राज्य शासन आणि प्रकरणपरत्वे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडे सादर करण्याकरिता जबाबदार असेल.

पाच) संशोधन कार्यक्रमांची अंमलबजावणी करताना कृषि विद्यापीठे अधिनियमांच्या तरतुदींचे, संविधींचे, राज्य शासनाचे तसेच परिषदेचे नियम व आदेश यांचे पालन करतात यावर तो लक्ष ठेवेल.

सहा) विद्यापीठांमध्ये संशोधन कार्यक्रमांशी संबंधित केलेल्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी आणि त्याचा अहवाल कृषि परिषदेच्या विचारार्थ सदस्य-सचिवाकडे सादर करण्याकरिता तो जबाबदार असेल.

सात) तो, विद्यापीठांच्या संशोधन कार्यक्रमांशी संबंधित नियतकालिक मूल्यमापन करण्याची व्यवस्था करेल व त्याचा अहवाल कृषि परिषदेकडे सादर करेल.

आठ) विद्यापीठांच्या संशोधन कार्याचा आढावा घेण्यासाठी व नियतकालिक मूल्यमापन करण्याकरिता संचालक (संशोधन), सहयोगी संशोधन संचालक व इतर शास्त्रज्ञ यांची बैठक बोलाविण्याचा त्याला अधिकार असेल.

नऊ) सदस्य-सचिवाने त्याच्याकडे विशेषरीत्या नेमून दिलेली कामे तो पार पाडेल.

**४. संचालक (विस्तार शिक्षण व साधनसंपत्ती विकास)**

राज्यातील कृषि विद्यापीठांमधील विस्तार शिक्षण विषयक सर्व कार्यक्रम, कार्ये यांच्यातील समन्वयन व त्यांची अंमलबजावणी आणि राज्यातील कृषि विद्यापीठांमध्ये साधनसामुग्री विकास कामांचे नियोजन करणे, कार्यक्रम, व्यवस्थापन व समन्वयन याकरिता यांच्याशी संबंधित बाबींमध्ये तो प्रत्यक्षपणे सदस्य-सचिवाला जबाबदार असेल. तो खालील कार्ये व कर्तव्ये पार पाडेल :-

एक) सर्व विस्तार शिक्षण कार्यक्रम व कार्ये सुरू करणे, त्यांचे नियोजन करणे, ती आयोजित करणे व त्यांची अंमलबजावणी करणे याच्याशी संबंधित बाबींमध्ये राज्यातील कृषि विद्यापीठांना सूचना देण्यासाठी व मार्गदर्शन करण्याकरिता तो जबाबदार असेल.

दोन) तो, राज्यातील कृषि विद्यापीठांच्या विस्तार शिक्षण संचालकाच्या कामाचे समन्वयन करेल आणि संबंधित संचालकांशी विचारविनिमय करून व कृषि विद्यापीठांमध्ये काम करणारे विद्याविषयक व इतर कर्मचा-यांच्या सर्व प्रवर्गांच्या विस्तार शिक्षणविषयक कामाचे पर्यवेक्षण करेल व मार्गदर्शन करेल.

तीन) कृषि विद्यापीठांनी स्वीकारलेल्या विस्तार शिक्षण कार्यक्रमाला लागू असलेल्या अधिनियमाच्या तरतुदी, संविधी व नियम त्याचबरोबर राज्य शासनाचे व परिषदेचे आदेश यांचे कृषि विद्यापीठांकडून पालन होते आहे की नाही यावर तो लक्ष ठेवेल.

चार) राज्यातील कृषि विद्यापीठांच्या विस्तार शिक्षण परिषदेचा तो निमंत्रित सदस्य असेल.

पाच) विस्तार शिक्षण व साधन सामुग्री विकास कार्यांशी संबंधित बाबींमध्ये विद्यापीठे व राज्य शासन / भारतीय कृषि अनुसंधान परिषद आणि अशा इतर संस्थादरम्यान संपर्क साधण्याकरिता तो जबाबदार असेल.

सहा) राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे योजना प्रस्ताव, विस्तार शिक्षण व साधन सामुग्री विकास कार्यक्रम व कार्ये यांची छाननी करण्याकरिता व ते राज्य शासन, परिषद आणि प्रकरणपरत्वे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेला सादर करण्याकरिता तो जबाबदार असेल.

सात) विद्यापीठांच्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांशी संबंधित विद्यापीठांमध्ये केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी तो जबाबदार असेल, ज्याकरिता विस्तार शिक्षण संचालकाच्या व विस्तार शिक्षण कार्यक्रमामध्ये समावेश असलेल्या इतर शैक्षणिक कर्मचारी वर्गाच्या बैठका बोलाविण्याचा त्याला अधिकार असेल, आणि त्याचा अहवाल तो सदस्य-सचिवाकडे सादर करेल.

आठ) विद्यापीठांच्या विस्तार शिक्षण कामाचे नियतकालिक मूल्यमापन करण्याकरिता तो जबाबदार असेल आणि त्याचा अहवाल विचारार्थ कृषि परिषदेच्या सदस्य-सचिवाकडे सादर करेल.

नऊ) इष्टतम उत्पादकता साध्य करण्याच्या दृष्टीने साधनसामुग्रीचे नियोजन व वापर यांच्याशी संबंधित बाबींमध्ये राज्यातील कृषि विद्यापीठांना सूचना देण्यासाठी व मार्गदर्शन करण्याकरिता तो जबाबदार असेल.

दहा) अंतर्गत साधनसामुग्री विकासाचे व निर्मितीचे विविध कार्यक्रम हाती घेताना कृषि विद्यापीठांद्वारे अधिनियमाच्या तरतुदी, राज्य शासन व कृषि परिषदेच्या संविधी व नियम तसेच निदेश यांचे पालन केले जाते यावर तो बारीक लक्ष ठेवेल.

अकरा) सदस्य-सचिव त्याच्याकडे विशेषरीत्या नेमून देईल अशी इतर विशेष कर्तव्ये व कार्ये तो पार पाडेल.

५. **सहसंचालक (वित्त)**

राज्यातील कृषि विद्यापीठांची वित्त व्यवस्था, अर्थसंकल्प, लेखे व लेखापरीक्षा यांच्याशी संबंधित बाबींमध्ये तो सदस्य-सचिवाला प्रत्यक्षपणे जबाबदार असेल. तो खालील कर्तव्ये पार पाडेल :-

एक) परिषदेच्या निधींच्या योग्य उपयोजनाकरिता आणि वित्त व्यवस्था, अर्थसंकल्प आणि लेखे व लेखापरीक्षा यांच्याशी संबंधित बाबींमध्ये परिषदेला व कृषि विद्यापीठांना सल्ला देण्याकरिता तो जबाबदार असेल.

दोन) राज्यातील कृषि विद्यापीठांच्या सर्व योजना प्रस्तावांची, परिषदेच्या त्या-त्या विभागांची त्या योजना प्रस्तावांना तांत्रिक दृष्टया मंजुरी मिळाल्यानंतर परंतु सदस्य-सचिवाकडे सादर करण्यापूर्वी वित्तीयदृष्टया छाननी करण्यासाठी तो जबाबदार असेल.

तीन) त्याच्या निदर्शनास आलेल्या वित्तीय अनियमितता, परिषदेच्या व राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्याकरिता तो जबाबदार असेल.

चार) कृषि विद्यापीठांच्या वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या व सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या छाननीकरिता आणि या बाबतीत परिषदेला व शासनाला सल्ला देण्यासाठी तो जबाबदार असेल.

पाच) परिषदेच्या व कृषि विद्यापीठांच्या अर्थसंकल्पीय प्रस्तावांच्या पुनर्विनियोजनाकरिता असलेल्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता व याबाबतीत परिषदेला सल्ला देण्याकरिता तो जबाबदार असेल.

सहा) योजनांतर्गत व योजनेतर अनुदान देण्याकरिता कृषि विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता व याबाबतीत शासनाला सल्ला देण्यासाठी तो जबाबदार असेल.

सात) सर्व वित्तीय बाबींच्या संबंधात तसेच वार्षिक लेखे पूर्ण करण्याकरिता व लेखा परिक्षणाच्या अनुपालनाकरिता कृषि विद्यापीठांच्या नियंत्रकाला, सूचना देण्यासाठी व मार्गदर्शन करण्याकरिता तो जबाबदार असेल.

आठ) वित्त व्यवस्था, अर्थसंकल्प, लेखे व लेखापरिक्षण याच्याशी संबंधित बाबींच्या बाबतीत कृषि विद्यापीठे अधिनियमाच्या तरतुदी, संविधी, राज्य शासन तसेच परिषदेचे नियम व निदेश यांचे पालन करतात का यावर लक्ष ठेवेल.

नऊ) सदस्य-सचिव त्याच्याकडे विशेषरीत्या नेमून देईल अशी इतर विशेष कर्तव्ये व कार्ये तो पार पाडेल.

६. **सहसंचालक (प्रशासन)**

परिषदेच्या सर्व प्रशासनिक बाबींकरिता तो प्रत्यक्षपणे सदस्य-सचिवाला जबाबदार असेल. त्याला पुढील अधिकार व कार्ये असतील :-

एक) परिषदेच्या प्रशासनिक कामांच्या योग्य अंमलबजावणीकरिता तसेच कृषि विद्यापीठांच्या शैक्षणिक अधिका-यांच्या बदल्या त्याचप्रमाणे राज्यातील कृषि विद्यापीठांची सर्व प्रशासकीय कामे यांसह परिषदेच्या प्रशासकीय कामाच्या योग्य कार्यान्वयनाकरिता तो सदस्य-सचिवाला सहाय्य करेल. राज्यामधील कृषि विद्यापीठांतील प्राध्यापक व त्यावरील संवर्गातील अधिका-यांच्या निवडीकरिता असलेल्या निवड समितीच्या उचित कार्याकरिता देखील तो सदस्य-सचिवाला सहाय्य करेल.

दोन) परिषदेच्या सर्व कर्मचा-यांचे काम व वर्तणूक याचे पर्यवेक्षण करण्यासाठी आणि त्यावर शिस्तविषयक नियंत्रण ठेवण्यासाठी तो सदस्य-सचिवाला सहाय्य करेल.

तीन) कृषि विद्यापीठांच्या सर्व प्रशासनिक बाबींच्या संबंधात, सर्व कृषि विद्यापीठे अधिनियमाच्या तरतुदी, संविधी राज्य शासन व तसेच परिषदेचे नियम व निदेश यांचे पालन करतात का यावर बारीक लक्ष ठेवेल.

चार) परिषदेच्या त्याचबरोबर विविध समित्यांच्या बैठकीची व्यवस्था करणे व ती बोलावणे याकरिता तो सदस्य-सचिवाला सहाय्य करेल.

पाच) सदस्य-सचिवाने त्याच्याकडे सोपविलेली किंवा त्याला नेमून दिलेली इतर कोणतीही कर्तव्ये तो पार पाडेल.